'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग


जळगाव (प्रतिनिधी) दि. २९ : जळगाव (प्रतिनिधी) दि. २९ - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व पीएम- उषा योजनेअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत दि. २८ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोज करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक पीएम-उषा प्रकल्प प्रमुख प्रा. आशुतोष पाटील, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या प्रा. पवित्रा पाटील, व्यवस्थापन प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटन सत्रात प्रा. आशुतोष पाटील यांनी पीएम-उषा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित करत मार्गदर्शन केले.

पहिल्या सत्रात उद्योजक व प्रशिक्षण सल्लागार श्री. विश्वनाथ कल्याण यांनी आंतरवैयक्तिक कौशल्यांवर मार्गदर्शन केले, संघात काम करण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी मिळविण्यासाठी ही कौशल्ये किती आवश्यक असल्याचे उदाहरणे देऊन सविस्तर सांगितले तर दुसऱ्या सत्रात कॉर्पोरेट प्रशिक्षक डॉ. सुमित्रा चव्हाण यांनी नातेसंबंध कौशल्ये व नेतृत्व विकास या विषयावर विविध नेतृत्वात्मक खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करूण नेतृत्वगुणांचे महत्व स्पष्ट केले. जळगाव जनता सहकारी बँकेच्या एच. आर. प्रमुख सौ. विशाखा पटेल यांनी समस्या सोडविणे व वेळ व्यवस्थापन या विषयावर प्रभावी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन कसे करावे याबाबत उपयुक्त सूचना दिल्या. शेवटच्या सत्रात श्री. रागीब अहमद यांनी प्रभावी संवाद कौशल्ये व विश्लेषणात्मक क्षमता या विषयावर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात प्रमुख अतिथी प्रा. अनिल डोंगरे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक व वैयक्तिक प्रगतीसाठी कौशल्य संचाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. आर. आर. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले, सूत्रसंचालन सौ. धनश्री शिरोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. दीपक फेरवानी यांनी केले.

**बातमी २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २९ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे सकाळी १०.०० वाजता विद्यापीठाच्या अधिसभागृहात आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील तसेच राज्याच्या विविध भागांत कार्यरत असलेले माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून आतापर्यंत एकूण ६३० माजी विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे.

या मेळाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केलेले जुने विद्यार्थी एकत्र येऊन आपल्या आठवणींना उजाळा देणार आहेत. परस्पर संपर्क पुन्हा दृढ करण्यासाठी तसेच अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी हा मेळावा एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. विद्यापीठाच्या विविध क्षेत्रांत यशस्वी ठरलेल्या माजी विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात येणार आहे. त्यांच्या अनुभवांतून सध्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून माजी विद्यार्थ्यांनी मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

**बातमी ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २९ : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे दि. १७ ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित चान्सलर ब्रिगेड आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर – आव्हान २०२६ शिबिरात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे नंदुरबार जिल्ह्याचे संघ व्यवस्थापक डॉ. नितीनकुमार माळी यांची उत्कृष्ट संघ व्यवस्थापक म्हणून निवड करण्यात आली. त्यांना पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी अभिनंदन करून सन्मानित केले.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक प्रा. योगेश पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. व्ही. एम. रोकडे, प्रा. सी. टी. आगे, श्री. शरद पाटील, श्री. कैलास औटी, श्री. विलास पाटील आदी उपस्थित होते.

दि. १७ ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत चान्सलर ब्रिगेड आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर – आव्हान २०२६ यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरात जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील प्रत्येकी २५ स्वयंसेवक यात १५ विद्यार्थी व १० विद्यार्थिनी तसेच प्रत्येक जिल्ह्याचे कार्यक्रम अधिकारी असा एकूण ७७ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता.

शिबिरादरम्यान शिस्त, प्रात्यक्षिके व आपत्ती व्यवस्थापन या विषयांवर घेण्यात आलेल्या विविध चाचण्यांच्या आधारे नंदुरबार जिल्ह्याचे संघ व्यवस्थापक डॉ. नितीनकुमार दादासाहेब माळी यांची उत्कृष्ट संघ व्यवस्थापक म्हणून निवड करण्यात आली. त्यांचा पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या यशामुळे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याची गुणवत्ता व आपत्ती व्यवस्थापनातील प्रभावी सहभाग अधोरेखित झाला आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २९ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता